

# सद्गुरु महिमा

– कृष्णा तेली, कुडाळ

**गुरुपौर्णिमेनिमित्त साईभक्तांना, हेमाडपंत लिखित श्री साईसच्चरित पोथीतील अध्याय ६ ते १० मधील गुरु भक्ती, गुरु महात्म्य विषयपर ओव्यांवर आधारित विशेष लेख.**



श्री सद्गुरु महिमा जाणून घेताना श्री बाबांनी केलेला उपदेश भक्तांना तारक ठरणारा आहे. आमच्यासारखे वाट चुकलेले मुमुक्षु जेव्हा संतांच्या सहवासात येतात त्यावेळी त्यांचे प्रेमळ हस्त शिरी ठेवताच जन्मोजन्मींच्या पापाच्या राशी धुवून निघतात. त्या गुरुस्पर्शाने प्रलयाग्नीचा दाहही शीतल व्हावा... असा सद्गुरुस्पर्श ज्यानी अनुभविला ते भक्त धन्य होत! करुणामूर्ती साईकडे त्या गोमट्या स्वरुपाकडे पाहाताच हृदयान्त आनंदाचे कारंजी उसळतात, कंठ सद्गतीत होऊन अष्टभाव दाटून येतो. त्या रामकृष्णादी रुपाने माझा साई सर्वत्र बिनठला आहे त्याची प्रचिती येते.

सद्गुरुनी 'आपणाकडे' येण्याची वाटचाल कीती दुर्लभ आहे हे ही सांगितले आहे. सद्गुरुप्राप्तीच्या मार्गात ठिकठीकाणी प्रलोभने, दुर्जन संगती, आळस, अविश्वास, कपटीपणा, ढोंगीपणा, विकल्प, वासना इ. षड्रिपूंचे थैमान सुरू आहे. या सर्व काट्याना दूर सारून आपली परमार्थाची वाट अढळ निष्ठेने सुरू ठेवायला सद्गुरुच आपल्याला वाट दाखवितात–

**काटा टाकुनी टाका पाय।**
**हाचि एक सुलभ उपाय ।।.**

तरच आम्ही निर्भयपणे गुरुपदाकडे मार्गस्थ होऊ मायेने प्रथम तमोगुणी जडपदार्थ तयार केले. नंतर रजोगुणातून चैतन्यरूपी सजीव प्राणी घडविले यापुढे जाऊन मायेचा सत्त्वगुणी आविष्कार जी 'बुद्धी', ती तयार झाली. या बुद्धीत परमात्म्याचा आनंदगुण मिसळून मायेने मोठी परमात्म्याकडची वाट मोकळी करून ठेवली आहे. त्याचा वापर साईभक्तानी करून या जन्मीच मुक्त होऊन जावे. बाकी, साईभक्ताना योगक्षेमाची विवंचना करण्याचे काही कारण नाही. ''माझ्या भक्तांच्या योगक्षेमाची-अन्नवस्त्राची मी हमी घेतलेली आहे.'' असे स्पष्ट आश्वासन 'श्री'नी दिले आहे. अनन्य श्रद्धेने जे श्री साईंना शरण आले ते प्रपंचातही तरले आणि परमार्थाचेही वाटेकरी झाले; हे आपण पाहतो आहोत. आपली सद्गुरुमुर्ती हृदयात संचरली असता ज्याचे अंग धर्मबिंदूनी डबडबून निघते व जो देहभान विसरून फक्त 'अनन्य' होतो तोच परमार्थाचा खरा पुजारी समजावा! फक्त 'हा'ला 'हा' मिळविणे व मान डोलावणे हे परमार्थाला व सद्गुरुना मुळीच आवडत नाही हे सद्भक्त जाणतातच. परमार्थात रोकडी प्रचिती वा अनुभूती ती हीच. आपल्या मनाला जर पूर्ण समाधान मिळत असेल तर ती सत्संगती समजावी. वासनांच्या धुमाकुळात मन भरकटून सैरावरा धावत सुटले असेल तर मन 'तल्लीन' कसे समजावे ? हिंदू असो व मुसलमान असो, तेथे सद्गुरु एकच काम करतात. भक्तांकडून कोणतीही अपेक्षा न ठेवता भक्तांच्या सुखदुःखात हे प्रेमळ संत सज्जन एकरूप होतात.

आम्ही जन्मापासून आजपर्यंत अर्धा काळ फक्त झोपेत घालविला. राहिलेल्या काळात अनेक प्रकारची दुःखे भोगली व यातायातीतच जीवन जगून धन्यता मानू लागलो. बाळपणी खेळ हेच सर्वस्व मानले. तरुणपणी स्त्रीलालसा धरून जीवन फुकट घालविले, पुढे म्हातारपणी व्याधींनी जर्जर होऊन गेलो. या गदारोळात सद्गुरुनाही विसरलो व आत्महिताचे असे काहीच घडले नाही. खरे पाहाता हा देह परमात्म्याची प्राप्ती करून घेण्यासाठी आहे. असे सर्व संत सांगतात. पण आम्ही हे कधी ध्यानात घेतले नाही. ''मनुष्य प्राणी मुक्त आहे, तो निर्भय व विवेकाने स्वतंत्र आहे आपण शाश्वत स्वरुपाचे अंश आहोत

हे फक्त त्याने या जन्मी जाणून घ्यावे या बद्दल सद्‌गुरु वारंवार एकांतातून लोकांतात येऊन सांगत असतात. देह हा मरणाधीन आहे हे सत्य उमगून या क्षणभंगूर देहासच योग्य वळण लावले तर परमेश्वर हाती येण्यास काही विलंब लागणार नाही. फक्त व्यर्थ धावपळ टाकून निजहिताचा उपदेश सद्‌गुरुंकडून घेण्यास मुमुक्षुनी तळमळ दाखविली पाहिजे.

देह माझ्यासाठी आहे 'मी' देहासाठी नाही (येथे 'मी' हे स्वस्वरुप जाणावे) म्हणून त्याचे मळमळते लाड न पुरविता त्याला बुद्धीचा लगाम लावायला शिकावे. माय निर्वाहापुरते अन्न, वस्त्र या देहाच्या प्राथमिक गरजा जरुर पुरवाव्यात मात्र नंतर त्याला आध्यात्मिक उन्नतीकडे राबवावा, त्याचे फाजील लाड आता पुरे झाले ! आपले हे मरणांचे फेरे कधी संपणार याचा केव्हातरी क्षणभर विचार करावा. तसेच 'पुढील जन्मी तरुन जातो'- म्हणणारा साधक पुन्हा याच नरदेहात जन्म घेणार कशावरून ? श्रुतीने सांगितल्याप्रमाणे माणूस जे जे कर्म करतो त्याप्रमाणे त्याला वेगवेगळी शरीरे प्राप्त होतात. म्हणूनच मानवजन्म हे मोठेच घबाड आपल्या हाती या जन्मी परमेश्वराने दिले आहे त्याचा पुरेपुर परमार्थात वापर करावा हेच खरे आत्मकल्याण !

माणसाने साधन सांभाळून परमार्थ केला तर अंतत: तो अविनाशी नारायण बनेल असा संतांचा आशीर्वाद आहे. सदैव आत्मानात्मविचार जागृत ठेऊन आत्मानुसंधान सांभाळले तर निश्चितपणे अज्ञान दूर होऊन याच जन्मी स्वस्वरूपावस्था प्राप्त होईल अशी अढळ श्रद्धा ठेवावी व कामाला लागावे. एकही क्षण फुकट घालवू नये. या देहाची महती फक्त सद्‌गुरुच जाणतात. ते जेव्हा या सद्भक्ताना उद्धारतात तेव्हा हा हा म्हणता तो माणूस तरुन पैलतीरी सुखरूप पोहोचतो. तो देहरुपाने नाममात्र या जगात राहातो खरा पण विदेहीपणाने संसारात वावरतो. श्री गुरु चैतन्यस्वरुप असल्यामुळे ते मुमुक्षुना मक्त करतात, बद्धता हाताशी धरून मुमुक्षु बनवितात. याच कार्यासाठी सद्‌गुरु अव्यक्तातून व्यक्तात (सूक्ष्मतून-स्थूलात) प्रवेश करून जनकल्याणार्थ देह झिझवितात. 'फकीरी' ही अव्वल बादशाही मानून 'श्री'नी क्षणभंगूर अमीरीठोकारली ! हे संतांचे जनउद्धाराचे कार्य असेच सुरू राहाणार आहे. सद्‌गुरुना काया-वाचा-चित्त-वित्त संवर्गाने जो भजतो व पूर्ण समर्पीत भावनेने जो त्यांचा जाहला तोच त्याना प्रिय होतो. ''माझ्यावर अनन्य प्रेम करणाऱ्या भक्तांवर मीही तसेच प्रेम करतो'' असे श्री साईंनी वारंवार विशद केले आहे.

सद्‌गुरु सांगतात ''सकाळी प्रात:कर्म आटोपून भक्तीभावाने माझ्या छबीचे दर्शन घेऊन, पूजा करून नैवेद्य दाखवा तसेच भुकेला प्राणी त्याला जो भाकर घालतो व नंतरच जो जेवतो व जो माझे रूप सर्व प्राण्यात पाहातो व काहीही भेदबुद्धी ठेवीत नाही तो भक्त साईना अत्यंत आवडता होतो.''

देव सर्व मायीक आहेत ते आज आहेत कालांतराने ते नाहीत ते या प्रकृतीचेच एक भाग आहेत पण सद्‌गुरु तसे नाहीत. ते पूर्ण शाश्वत आहेत. सद्‌गुरुंच्या कृपाकटाक्षाने आधीदैवीक, आध्यात्मिक किंवा आधीभौतीक (त्रिपात) सर्व नष्ट होतात. सद्‌गुरुंची स्थिती ही अंतरी परब्रह्मस्थिती व बाहेर विक्षिप्त पिशाच्यास्थिती दिसते. आत ते अद्वैती रमतात. तर बाहेर ते विश्वात सामान्यासारखे कर्तव्ये पार पाडतात. म्हणून प्रत्येकाने आपली दैवी संपत्ती परिपक्व करून नियत गुरुंच्या साह्याने मोक्षाचा धनी व्हावे. मोक्षाच्या मार्गी लावणारा गुरु हा अनियत गुरु समजावा. पण प्रत्यक्ष मोक्ष देणारा (प्रदान) करणारे तेच सद्‌गुरु ही खूण ओळखावी या नश्वर जगात कुठेच गुंतला नाही तोच निर्मुक्त समजावा. चित्ताचे काम त्याला जे देऊ तेच करणार जर चित्ताला विषय पुरविले तर ते विषयासक्त होऊन त्यात रममाण होणार किंवा जर गुरुचिंतनात रमविले तर ते गुरुचिंतनात निमग्न रहाणार म्हणून चित्ताला आपण काय चिंतनाचा विषय द्यावा हे नक्की ठरवावे व धन्य होऊन जावे.

प्रपंचातील चतुरपणाच्या गोष्टी प्रपंचात शोभून दिसतात, पण गुरुभक्तीच्या कामी हे काही येणार नाही. ''साई साई'' निरंतरपणे आपण जपाल तरच नि:संदेहपणे हा संसाराचा बेडा पार करून जाल.

विषयातून (प्रपंचातून) मन पूर्ण काढून ते सत्संगतीत रमविले तरच स्वस्वरुपाचा ठाव लागणे शक्य होईल अन्यथा नाही. सत्संगाचा काय उपयोग असतो याकडे जरा लक्ष द्यावे.

सत्संगतीने सर्वात मोठा लाभ होतो तो हा की 'देहाभिमान' गळून जातो. जन्ममरणाची येरझार थांबते त्याचबरोबर चैतन्य धन परमात्मा प्रत्यक्ष भेटतो. त्यामुळे जगाचा प्रलय होतानाही सत्संगतीने माणूस तरून जाऊन शाश्वताकडे पूर्णपणे विसावतो. ही सत्संगती म्हणजेच संतसंजनी लाभली की उत्तम गती प्राप्त होते. म्हणून संतांना शरण जाताच ही शाश्वताची मोठी भेट प्राप्त होते.

श्री साईंच्या कृपाकटाक्षासाठी आपण त्यांचे प्रिय होऊन त्यांचे अखंड स्मरण ठेवू या तरच ही किमया शक्य आहे.



**चिंतन**

# चिरंतन सुखाच्या शोधांत

- भालचंद्र केशव गंद्रे, ठाणे.

सुखं व दु:खंही जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. हरेक जीवाच्या वाटेला ती जशी कमी-अधिक येतील, तस-तशी ती बिनबोभाट भोगावीत. सुखाने हर्षाचा उन्माद होऊ नये तर दु:खाने जीव वेडा होऊ नये इतक्या शांततेने तटस्थतेने त्यांच्याकडे बघण्याची शक्ती उपासनेने म्हणजेच पर्यायाने नामामुळेच शक्य होते. नामाच्या संगतीनेच दु:खाची तीव्रता न भासता, तो भोग कुडी निवांतपणे भोगू शकते-पेलू शकते. पण त्यासाठी प्रसंगी जबरदस्तीने-निष्ठेने घेतलेले हरी-नामच अंतिमत: उपयोगी ठरते !

### दु:ख 'मी-पणाने' झाले :

देव रक्षण करणारा, तारणारा आहे हे एकदा उमगल्यावर चित्तात भिती, काळजी रहात नाही. मनाने एकदा परमात्म्याचे झाल्यावर म्हणजेच माझा प्रपंच हा देवाचाच आहे असे म्हटल्यावर काळजीचे कारण उरत नाही. मात्र, प्रयत्न न सोडता, सारा भार त्याच्यावर सोपवल्यावरच त्याचा तोच योग्य ते पाहून घेतो. नि मग जे घडेल ते माझ्या भल्यासाठी ही खुणगांठ पक्की झाल्यावर माणूस डगमगत नाही. मात्र, यासाठी आपल्या कर्मावर आपल्या नामावर जबरदस्त निष्ठा-श्रद्धा असावयास हवी ! आजवर जे-जे काही केले ते मी पणाने झाले. म्हणजेच 'मी केले' ही भावना जोपर्यंत देहाशी 'माझे-मी पण'' ठेवते, ते ते सारे दु:खाला कारण होते. मी पणाची धडपड जोवर आहे तोवर समाधान नाही. हा कर्तेपणाचा अभिमानच दु:खाला खऱ्या अर्थाने कारण ठरतो व खऱ्या सुखाला-समाधानाला जीव पारखा होतो. सर्व बंधनाचे, दु:खाचे कारण म्हणून कर्माचा कर्ता जो 'मी' हाच आहे. हे मी माझे-पणाचे ओझे ज्यांनी उचलले नाही, उरी बाळगले नाही तो जीव मात्र ह्या मी-पणाच्या ओझ्यातून मुक्त झाला. म्हणजेच अंतिमत: सुखी झाला व जे हे मी पणाचे ओझे उराशी बाळगून बसले, ते दु:खाला-त्रासाला कारण ठरले हे निश्चित !

### सुखाच्या शोधात :

हव्या त्या साऱ्या गोष्टी मिळाल्या म्हणजे सुख मिळेल असे वाटले. मात्र जस-जशी एकेक वस्तू प्राप्त होत जाते, तस-तशी आणखी न्यूनता वाढते. अजून ते कमी आहे, ते हवे हा हव्यास जीवाच्या अंतापर्यंत संपतच नाही. नि एकेक गोष्ट-वस्तू-चीज



मिळवता-मिळवता जीवनाची संध्याकाळ केव्हा आली हे समजत नाही. दारुच्या नशेत असणाऱ्यांना त्या नशेचा अंमल-शरीरावर असेतोवर कशा-कशाचे भान नसते. ना वस्त्राची शुद्ध, ना इभ्रतीची शुद्ध, ना खिशातल्या पैशाची शुद्ध असते. पण ही नशा उतरल्यावर ते एकदम भानावर येतात नि आपण हे काय केले, याचे क्षणभर का होईना, त्यांना भान येते. त्या क्षणाला चुकलो-चुकलो करीत ते अश्रूही ढाळतात. पुन्हा असे करणार नाही म्हणून आणा-माकाही घेतात. पण पुन्हा-पुन्हा त्याच विषयाकडे, त्याच व्यसनाकडे वळून स्वत:ची-संसाराची राखरांगोळी करतात. विषयातले सुख परावलंबी व विषयावरच अवलंबून असते. दुसरे म्हणजे विषयाचे सुख इंद्रियाधीन असते. मात्र उद्या मृत्यू येणार हे समजल्यावर विकलांग-अवस्थेत काय सुख मिळणार ? उलटपक्षी, एवढा सारा दिवसांचा-वर्षांचा पसारा जगूनही शेवटी सुख-तृप्ती त्यात नेमकी मिळाली का ? हाही एक संशोधनाचा नि विचार करण्याचा विषय-मी कोण, कशासाठी आलो नि काय करतोय, या प्रश्नाची उत्तरे आपल्या आत्म्याशी प्रामाणिकपणे शोधली-

विचारली की समजते की, या क्षणभंगूर सुखासाठी, सुखाच्या स्थितीसाठी जे-जे म्हणून प्रयत्न केले त्यातून अंतिम सुख वाट्याला आलेच नाही. उलटपक्षी, बाकी उरलेल्या न्यूनतेतील सुखासाठीच पुन्हा-पुन्हा धाव घेतली नि खरे सुख पुन्हा दूरच राहिले. ईश्वर नामाने मिळणारे सुख हेच शेवटी तृप्ती देणारे, त्याग वाढविणारे नि शांती देणारे ठरते !

**मी कोण ? कुठला ?**

**'मी कोण'** हे जोवर आपण ओळखत नाही तोपर्यंत वैभवाच्या शिखरावर जाऊनही खरा आनंद समाधान, तृप्ती मिळणार नाही. कारण सुखासाठी ना-ना खटपटी-लटपटी करून जमा केलेले करोडो रुपये उद्या कुणी पिस्तुल रोखून क्षणात घेऊन जाईल का ? हे प्रश्नचिन्हही चिंता, व्याप, दु:ख तयार करते. नि सर्वांना सुखी, श्रीमंत वाटणारा जीव अंतस्थ प्रश्नांनी त्रासलेला-चिंतातूर असतो. उलटपक्षी, मर्यादित इच्छा असलेला जीव मीठ-भाकरी खाऊन क्षणात निवांत झोपू शकतो. श्रीमंतांना हे वैभव कसे टिकेल, उद्या ते संपेल का ? पुढे काय ? या नानाविध प्रश्नांनी झोप येत नाही. नि झोपेच्या गोळ्या घेऊन त्या जीवांना निद्राधिन व्हावे लागते. म्हणून वैभवात-श्रीमंतीत खरे सुख नाही. अनाथ-अपंग-निराधार जीवांना आश्रय देणारे सह्रामास दुर्मिळ आहेत. पण ह्या अनाथांना माणुसकीचा-मायेचा ओलावा देऊन त्या जीवात नवी उभारी-नवी जान आणणारेच खरे संत आहेत. जीवनाची गुह्य ठेव त्यांनाच गवसलीय नि कुणालाही न दिसणाऱ्या अभंगाशाश्वत सुखाचे ते खरे अधिकारी झाले आहेत. सुख-दु:ख जाणिवेत आहे. आपल्याला मिळायचे तेवढेच मिळते. पण आपले हवे-नकोपण, म्हणजेच आपली त्या वस्तूची वासना गेली की सुख-दु:ख रहात नाही. मात्र, वासना मारायला भगवंताचे अधिष्ठान हवे. म्हणजेच आपल्या लाडक्या-आवडत्या देवाचे नाव घेत-घेतचू कर्म करावे. जस-जसे नाम वाढेल तस-तशी ही वासना दुबळी पडत जाते. मन ओढाळ वासनेत अडकत-फसत जाते. पण आत्मा जो चिरंतन सत्य आहे त्याला सत्याची-शाश्वताची ओढ असते. त्यामुळे एखादे वाईट कर्म करतानाही कुठेतरी खोलवर आत 'हे बरे नाही', 'हे खरे नाही' असा आक्रोश आत्मा करीतच असतो. परंतु मनाची लालसा व ओढ जबर असल्याने, मन:शक्तिपुढे आत्म्याची धाव जात नाही. पण जेव्हा अपयश येऊन वा थप्पड खाऊन कर्म परत येते, त्यावेळी हा चिरंतन आत्माच 'उगी-उगी' करीत असतो. नि आपलीच आपल्याला शरम वाटते. परंतु ह्या सत्याच्या पगडा क्षणभरच टिकतो नि मन पुन्हा दुसऱ्या विषयात उड्या मारायला लागते. वासना ही कोणत्याही विषयांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. मी कर्ता नसून, परमात्मा कर्ता आहे ही भावना व्हावयास हवी. कित्येकदा चांगल्या-सत्य गोष्टी कळूनही त्याचा अंमल मनावर कायम रहात नाही नि पुन्हा-पुन्हा वासनेत अडकून मन दु:खी बनते. यापेक्षा चिरंतन सत्य असे जे देवाचे नाम यालाच सरळ नतमस्तक होऊन, नामाच्या सान्निध्याने प्रयत्नाची कास धरल्यास खरा आनंद, खरे सुख चिरंतन ठरते-चिरंतन उरते !!

## शिर्डी दर्शन

**चला जाऊ या शिर्डी पाहू या ।**
**साईबाबांचे दर्शन घेऊ या ।।ध्रु।।**

**शिर्डी हे भारतातील मुख्य मोठे तीर्थक्षेत्र ।**
**विघ्ने पळती दूर होता साई कृपापात्र ।।**
**साईबाबांसी अंत:करण अर्पूया ।**
**साईबाबांचे दर्शन घेऊ या ।।१।। चला जाऊ या...**

**शिर्डीचे साईबाबा एक महान संत ।**
**कृपाळू साई परमेश्वर मुर्तीमंत ।।**
**हात जोडूनी त्याला वंदू या ।**
**साईबाबांचे दर्शन घेऊ या ।।२।। चला जाऊ या...**

**शिर्डीस येती सर्व धर्माचे लोक ।**
**साई ही वदे सबका मालिक एक ।।**
**श्रद्धा भक्ती सबुरी धरु या ।**
**साई बाबांचे दर्शन घेऊ या ।।३।। चला जाऊ या...**

**- ज्ञानेश्वर नाईक, पुणे.**

## गुरुमहात्म्य

गुरुनाम आणि गुरुसहवास ।
गुरुकृपा आणि गुरुचरण पायस ।
गुरुमंत्र आणि गुरुसहवास ।
महत्प्रयास प्राप्ति ही ।।५८।।
प्रचंड शक्ति यया पोटीं ।
अतुल्य भक्ति घेतली कसवटी ।
भक्तांसी मोक्षद्वारवटी ।
येतील लोटीत नकळता ।।५९।।
गुरुसंगति गंगाजळ ।
क्षालिते मळ, करिते निर्मळ ।
मनासम दुजे काय चंचळ ।
करिते निश्चळ हरिचरणीं ।।६०।।



# दीनांचा दयाळू । मानवतेचा पुजारी ।

- विद्याधर ताठे, मुंबई.

**शिर्डीचे श्री साईबाबा हे आधुनिक युगातील अवतारी संत होत. कोणी त्यांना दत्तावतार मानतात तर कोणी भक्त कृष्णावतार म्हणून त्यांची पूजावंदना करतात 'ज्या मनी जैसा भाव । त्या तैसा अनुभव ।' या उक्ती प्रमाणे साईबाबांनी प्रत्येक भक्ताला त्यांच्या आवडत्या रूपात दर्शन दिले व ईश्वर एक आहे याचा बोध केला. रंजल्या-गांजल्या दीनदुबळ्यांची त्यांनी आत्मियभावाने सेवा केली व समाजसेवा हीच ईश्वरसेवा हे आपल्या आचरणातून दाखवून दिले. त्यांच्या अनेक अतर्क्य लीला उदात्त मानवधर्माचे, विश्वबंधुतेचे आणि त्यांच्या समाजाभिमुखतेचे दिव्य दर्शन आहे.**

**जे का रंजले गांजले ।**
**त्यासी म्हणे जो आपुले ॥**
**तोचि साधू ओळखावा ।**
**देव तेथेचि जाणावा ॥**

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांनी वरील अभंगातून जनसेवेचे-समाजसेवेचे अनन्यसाधारण महत्त्व विशद केलेले आहे. या अभंगावरून संत हे टाळकुटे, आत्मोद्धार केंद्रीत स्वार्थांध नव्हते तर त्यांना भोवतालीच्या समाजाचे भान होते व सकल समाजाच्या उद्धाराची ओढ-तळमळ होती हेच प्रकर्षाने जाणवते. समाजातील तळागाळातील रंजल्या-गांजल्यांना जो आपले म्हणतो तोच खरा साधू आणि रंजल्या गांजल्याच्या सेवेतच खरा देव आहे असे म्हणणारे, उपदेश करणारे संत तुकाराम हे सकळ संतांचे प्रातिनिधीक रूप आहे. **पुण्य परोपकार । पाप ते परपीडा ॥** हे त्यांचे आणखी एक अभंगवचन त्यांच्या समाजाभिमुखतेचीच साक्ष आहे. पाप-पुण्यांचा हा संतांच्या विचार बऱ्याच जणांना अपरिचित आहे. या अभंगातूनही संतांचा परोपकार विषयक दृष्टिकोन दिसून येतो. खरं तर काळ-स्थळ आणि समाज वेगवेगळा असला तरी सकल संतांच्या कार्याचे ब्रीद **'बुडते हे जन न देखवे डोळा ।** हेच आहे, असे प्रत्येक संतचरित्रांचे आलोडन केल्यावर जाणवते. शिर्डीच्या श्री साईबाबांचे जीवन हीसुद्धा भक्तांच्या उद्धारासाठी प्रवाहीत झालेली एक प्रेमगंगा आहे. साईश्री म्हणजे 'दीनाचा दयाळू व मानवतेचा महान पुजारी आहे.

**साधु दिसती वेगळाले ।**
**परी अंतरी मिळालेले ।**

या संतवचनाप्रमाणे वेगवेगळ्या संतमहात्म्यांमध्ये वरवर पाहता बरीच भिन्नता आढळते पण थोड्या सूक्ष्म दृष्टिने पाहिले तर सकल संतांमधील एकसूत्रतेचे समानतेचे दिव्य दर्शन आपणास घडते. अशी सूक्ष्म दृष्टी लाभली म्हणजे भक्तांना **'सबका मालिक एक'** या साईवचनाचा बोध होतो. मग त्यांच्यादृष्टिने संतांची जात, धर्म, वर्ण, प्रांत, भाषा हे सारे भेद गळून पडतात. मग साईबाबा हिंदू का मुसलमान ? दत्ताचे अवतार की कृष्णाचे अवतार ? हे प्रश्न प्रश्न राहात नाहीत. मग भक्तांची दृष्टि इतकी उदार व व्यापक होते की त्याला मशिद द्वारकामाई वाटू लागते. **एकम् सद विप्रा बहुधा वदन्ति ।** या बोधवाक्याचा परम अर्थ प्रतित होतो. आकाश एक आहे, ईशतत्व एक आहे याचा अंतरिक साक्षात्कार होतो. आणि दृष्टिला अशी उदात्तता लाभली म्हणजेच जनामध्ये जनार्दन दिसू लागतो व जनता जनार्दनाची सेवा हीच ईशसेवा वाटू लागते.

## साईजीवन मूर्तीमंत सेवाजीवन

श्री साईबाबांचे जीवन म्हणजे मूर्तीमंत सेवाजीवन आहे. त्यांच्या अवतार कार्याचा उद्देशच मुळी मानवसेवा व मानवधर्माची स्थापन आहे. श्री साईबाबाचा जन्म केव्हा आणि कोठे झाला ? कोणत्या परिवारात झाला ? हे प्रश्न निरर्थक प्रश्न आहेत. कारण स्वत: साईबाबांनी ही माहिती कधीही कोणालाही सांगितलेले नाही. यावरून जन्माधिष्ठित उच्चनीचपणाच्या विचाराला, साईबाबांना समाजातून नष्ट करायचे होते हेच जाणवते. **जन्माने नव्हे तर कर्माने माणसाच्या श्रेष्ठतेचा विचार केला जावा अशीच जणू श्री साईंना आपल्या भक्तांना याद्वारे शिकवण द्यावयाची असावी असे वाटते.**

श्री साईबाबा एका लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर शिर्डीत आले आणि शिर्डी हेच त्यांच्या अवतार कार्याचे क्षेत्र झाले. त्यांनी

गावाबाहेरील पडक्या मशिदीलाच आपले निवासस्थान केले. गावात ४-५ घरे भिक्षा मागावी आणि एक दिवस मशिदीत, एक दिवस चावडीत मुक्काम करावा. फकिराचा वेश, मशिदीत निवास आणि मोगलाईतील भाषा या बाह्यांगाकडे पाहून अनेकांनी त्यांना मुसलमान ठरवले आणि त्यांनी मशिदीला जेव्हा 'द्वारकामाई' नाव दिले व मशिदीत अखंड धुनी पेटविली तेव्हा लोकांना ते मुसलमान का हिंदू हा प्रश्न पडला ? पुढे साईबाबांनी आपल्या विविध लीलांनी भक्तांच्या या प्रश्नाला गौण ठरविले व मानवधर्माची उदात्त दृष्टि त्यांना दिली. गोर गरिबांच्या सेवेनेच त्यांनी आपल्या अवतार कार्याचा श्रीगणेशा केला. गरीब-गरजूंची, दीन-दुबळ्यांची सेवा हेच जणू प्रारंभीच्या काळात त्यांचे व्रत होते. कुष्टरोगी-महारोगी-रक्तपीती अशांना लोक वाळीत टाकत व त्यांच्या जीवनाचे अतोनात हाल होत. पण अशा दीनदुबळ्या उपेक्षितांच्या दुःखावर मायेची पाखर घालण्याचे अलौकिक कार्य श्री साईबाबांनी केले. महारोग्यांना स्वच्छ अंघोळ घालण्याचे, त्यांच्या जखमा धुऊन मलमपट्टी करण्याचे सेवाकार्य मोठ्या आत्मियतेने त्यांनी केले. घरोघर हिंडून रूग्णांना औषध देण्याबरोबर त्यांच्या मनाला खचलेल्या मनाला उभारी देण्याचे महान कार्य त्यांनी केले.

**आरंभी गांवी वैद्यकी करीत ।**
**पाहुनि पाहुनि दवा देत ।**
**हातालाही यश बहुत ।**
**हकीम विख्यात जाहले ॥४६॥**

या हेमांडपंत विरचित श्री साईसच्चरित पोथीतील ओव्यावरून श्री बाबांच्या वैद्य-हकीम म्हणून प्रारंभीच झालेल्या ख्यातीची कल्पना येते. त्यांची समाजसेवेची वैशिष्टये म्हणजे १) ते स्वतःहून आजाऱ्याकडे, रुग्णाकडे जात २) त्यांच्या सेवेत कर्तव्य भावनेपेक्षा प्रेमभावना म्हणजेच माणुसकीचा ओलावा होता. ते उपचाराबद्दल कोणाकडूनही एक पै देखिल मोबदला घेत नव्हते.

**दिडकीस नाही कोणाच्या शिवले ।**
**गुणाने प्रख्यातीत पावले ।**
**गरीब दुबळ्यांस आरोग्य दिधले ।**
**हकीम गांजले ते प्रांती ॥७:७०॥**

श्री साईसच्चरित पोथीतील सातव्या अध्यायातील या ओव्या बाबांच्या मानवसेवा व्रताची वैशिष्टये दर्शविणाऱ्या आहेत.



## लीला हाच उपदेश-संदेश

संत गाडगे महाराज जसे गाव स्वतःहातात झाडू घेऊन साफ करीत तशी स्वच्छता श्री साईबाबांनी स्वतः पुढाकार घेऊन प्रारंभीच्या काळात केली व कोणताही उपदेश न करता स्वतःच्या वृत्तीतून त्यांनी सार्वजनिक स्वच्छतेचा आदर्श लोकांपुढे ठेवला. इतर संतांप्रमाणे श्री साईबाबांनी प्रकटपणे प्रवचन-कीर्तने केलेली नाहीत. पण त्यांच्या अनेक लीला हाच त्यांचा कृतीशील उपदेश आहे.

खानदेशातील लोकनेते दादासाहेब खापर्डे यांच्या मुलाचा ग्रंथीज्वर, नारायण गावच्या भीमाजी पाटलाचा क्षयरोग आणि डॉ. पिल्ल्याचा नारू रोग हे असाध्य रोग त्यावेळी साईबाबांनी बरे केले. स्वतः साईबाबा रुग्णसेवा-मानवसेवा हीच ईशसेवा मानत होते आणि आपल्या भक्तांनाही आग्रहाने तोच संस्कार देत होते.

एकदा एक महारोग झालेली बाई साईबाबांकडे आली. बाबांनी भीमाबाई नावाच्या एका भक्त महिलेस तिला तिच्या घरात रहाण्यास जागा देण्यास सांगितले. तेव्हा भीमाबाईंनी ती बाई महारोगी आहे तिला माझ्या घरात कशी जागा देऊ ? असा बाबांना प्रश्न केला. तेव्हा बाबा म्हणाले- 'अग ती महारोगी असली म्हणून काय झाले ? माणूसच आहे ना ?

आपली बहिण म्हणून तिला घरी ठेवून घे.' बाबांच्या या निश्चयी स्वरातील आज्ञेने भीमाबाईने त्या महारोगी बाईस घरी ठेवून घेऊन तिची सेवा केली. त्या बाईची सेवा हीच श्री साईसेवा (ईशसेवा) म्हणून भीमाबाईंनी आनंदाने केली.

असेच एकदा श्री बाळाजी पाटील नेवासकर यांनी शिर्डीत काही दिवस राहिल्यानंतर आपल्या गावी परत जाऊ नका ? म्हणून श्री साईबाबांना विचारले. तेव्हा **'तो आपला दगडूभाई आजारी आहे त्यांची सेवा करा व तो बरा झाल्यावर जा.** असे साईबाबांनी नेवासकरांना सांगितले. दगडूभाई हा मुसलमान होता व रक्तपितीने आजारी होता. सुमारे महिन्यांनी तो बरा झाला. पण बाबांची आज्ञा म्हणून नेवासकरांनी आनंदाने दगडूभाईची महिनाभर सेवा केली.

### रुग्ण व व्याधीग्रस्तांना अन्नदान

**षड्रसान्नी जैसे वरान्न।**
**पुण्यात पुण्य अन्नदान ॥२१॥**

**त्यातही व्याधिष्ठ शक्तिहीन।**
**अंध पंगू बधिर दीन।**
**तयाला आधी घालावे अन्न।**
**आप्तेष्ट जन त्यामागे ॥२३॥**

(अध्याय ३८)

अन्नदानाबद्दलची साईबाबाची विचारसरणी साईभक्त हेमांडपंत यांनी वरीलप्रमाणे शब्दबद्ध केली असून अन्नदानाला बाबांच्या दृष्टिने फार मोठे महत्त्व होते. बाबा स्वत: शिर्डीत काही घरे भिक्षा मागून अन्न घेऊन येत व ते सर्व अन्न गरीब रुग्णांना वाटत असत. कधी कधी मशिदीच्या म्हणजेच द्वारकामाईच्या अंगणात ते मोठी चूल मांडून मोठ्या हंड्यात अन्न शिजवीत आणि गोरगरीबांना-रुग्णांना दान करीत. आपल्याकडे येणाऱ्या श्रीमंत-सधन भक्तांनाही ते गोरगरीबांना अन्नदान करण्यास सांगत. व्रतवैकल्ये-उपवास- पूजाअर्चा करण्यापेक्षा अन्नदान करणे अधिक श्रेयस्कर आहे असे बाबा भक्तांना सांगत. साऱ्या प्राणीमात्राची धडपड पोटासाठी-अन्नासाठी असते त्यामुळे या मूलभूत निसर्गदत्त गरजेची पूर्ती बाबांच्या दृष्टिने सर्वात महान कार्य होते.

**सेवा परमो धर्म: ।** हाच खर तर श्री साईलीलांचा अर्थ आहे. **न त्वम् कामये राज्यम् न स्वर्ग ना पुनर्भवम्। कामये दु:ख तप्तानाम् प्राणीनाम् आर्तीनाशनम्।**

मला राज्य नको, मला स्वर्ग नको, मला पुनर्जन्माचीही अपेक्षा-इच्छा नाही. माझी एकच इच्छा आहे ती म्हणजे दु:खी प्राणीमात्राचे दु:ख दूर करण्याची. अशी प्रार्थना श्री साईबाबा करीत नव्हते पण त्याच्या एकूण जीवनाचे सूत्र हेच होते असे दिसते.

Do you like to see God
Face to face
Here, in this world
with these eyes?

Serve a man in distress
And see God
In his smiling face.

स्वामी विवेकानंदांचे हे विचार, समाजसेवा हीच ईशसेवा हे पटवून देणारे असून श्री साईबाबांनी असे सूत्रबद्ध-सुविचार लिहिले नसले तरी श्री साईबाबांचे जीवन हे **'समाजसेवा हीच ईशसेवा'** या विचाराचा मूर्तीमंत आधार आहे. म्हणूनच श्रीसाईबाबाना भक्तांनी **'दीनांचा दयाळू'** अशा समर्पक विशेषणांनी गौरविलेले आहे.

### साईबाबा संस्थानची ईशसेवा

श्री साईबाबा यांच्या अवतार कार्याची इ. स. १९१८ साली दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर समाप्ती झाली. त्यानंतर त्यांच्या भक्तमंडळींनी एकत्र येऊन बाबांचे कार्य पुढे चालू ठेवले. कालांतराने श्री साईबाबा संस्थानची स्थापना झाली आणि सध्या धर्मादाय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र संचालक मंडळ श्री साईबाबाचे कार्य पुढे चालवित आहे. संस्थानतर्फे शिर्डी येथे श्री साईनाथ हॉस्पिटल चालविले जाते. ज्याने श्री साईबाबाच्या वैद्यकीय सेवेचा वारसाच या हॉस्पिटलद्वारे संस्थान समर्थपणे चालवित आहे. त्याशिवाय मोफत नेत्रचिकित्सा व शस्त्रक्रिया शिबीर, जयपूर फूट वितरण, आदी अनेक प्रकारची चिकित्साशिबीरे दरवर्षी आयोजित केली जातात. संस्थानतर्फे आय. टी. आय. प्रशिक्षण संस्था, माध्यमिक शाळाही चालविली जाते. संस्थानकडे येणाऱ्या देणग्यातील काही रक्कम अनुदान म्हणून विविध सेवाभावी सामाजिक-शैक्षणिक संस्थांना दिली जाते. फिरती चिकित्सा केंद्रे चालविणाऱ्या काही स्वयंसेवा संघटनांना संस्थानने मोटारगाड्याही देणगी म्हणून दिलेल्या आहेत. अशा प्रकारे सढळ हाताने अनुदान देऊन श्री साईबाबा संस्थानने सामाजिक-शैक्षणिक सेवाकार्याच्या क्षेत्रात फार मोठे योगदान दिलेले आहे. धार्मिक संस्था व संघटनांची कालानुरुप समाजाभिमुखता ही सध्याची फार मोठी गरज असून श्री साईबाबा संस्थानचे समाजाभिमुख कार्य निश्चितच आदर्श व अनुकरणीय आहे असे वाटते.



# श्रद्धा

– अशोक एस. अर्धापुरे, औरंगाबाद.

"श्रद्धा" ही संकल्पना केवळ आध्यात्मिक धारणेचा अविभाज्य भाग नसून दैनंदिन व्यवहारातसुद्धा श्रद्धेला एक आयाम आहे. परस्पर संबंध, एकादे कठीण कार्य श्रद्धा असल्याशिवाय पूर्ण होत नाही. श्रद्धा ठेवून केलेले कार्य, कर्त्याच्या मानसिकतेशी निगडीत असते. त्यामुळे त्या कार्यात, परस्पर संबंधात सुलभता, सहजता निर्माण झालेली असते. श्री साईबाबांच्या दृष्टांतामध्ये अध्यात्म अन् व्यवहार यांचा सुरेख संगम झालेला दिसतो. त्यामुळेच बाबांच्या उपदेशात "श्रद्धेला" अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे.



श्रद्धा म्हणजे निष्ठा, विश्वास होय. मूलत: मनुष्य कशावर तरी श्रद्धा ठेवूनच जगत असतो.

**श्रद्धमयोयं पुरुषो यो**
**यच्छ्रद्धः स एव सः ।**

(गीता १७.३)

मनाची एकाग्रता, भाव; आगतिकता, पूज्य बुद्दी, सातत्य, डोळस ध्येय, सात्विकता आदी गुणाच्या परस्पर संबंधातूनच श्रद्धेचा उगम होतो. श्री ज्ञानदेवांनी पसायदानात, "ईश्वर निष्ठांची मांदीयाळी" या भावावर प्रकाश पाडून श्रद्धेविषयी विस्तृत विवेचन केले आहे. खरा भक्त आपली श्रद्धा वा निष्ठा ईश्वराप्रती अखंडपणे जपतो. तो केवळ विषयासक्त होऊनी श्रद्धेची डिंडोरा पिटत नाही. त्याच्या श्रद्धेत सात्विकता असते. संसारात राहून भौतिक सुखाचा भोग घेत असला तरी त्याबद्दल तो आसक्ती बाळगत नाही. भौतिक सुखाला तो अंतिम ध्येय न मानता ईश्वराशी एकनिष्ठता वा एकरुपता हेच अंतिम ध्येय असे तो मानतो. श्री ज्ञानदेवाने या वृत्तीचे यथार्थ व समर्पक वर्णन केले.

**तो शरिराचेनि मेळे । करु का कर्मे सकळे ।**
**परि आकाश धुये न मैळे । तैसा असे ॥**

संसारसुखाचा भोग घेताना ऐहीक सुखाच्या आहारी जाऊन सत्पुरुष हा ईश्वरनिष्ठा मलीन होऊ देत नाही. आकाशात धूर पसल्याने काही आकाश मळकट होत नसते. तद्वतच खरा भक्त संसारात राहूनसुद्धा ईश्वर वा गुरुप्रती श्रद्धेला तडा जाऊ देत नाही वा श्रद्धा मलीन होऊ देत नाही.

देवतेवर वा गुरुवर निष्ठा वा श्रद्धा ही भक्तास भौतिक स्वरुपात काही देते असे नाही तर त्यातून जी अनुभूती होते ती केवळ श्रद्धा बाळगणाऱ्यासच अनुभवता येते अन् अशी अनुभूती सर्वोच्च दर्जाचीच असते.

भक्ताचा दृढ विश्वास, मनाची एकाग्रता जोपर्यंत ईश्वर वा गुरु यांच्या आत्मस्वरुपाशी, आत्मस्वरुपाच्या अणुशी समाधीस्थ होत नाही तोपर्यंत श्रद्धेची अनुभूती मिळणे अशक्यच. अगतिकतेच्या भावाबरोबरच ईश्वर/गुरुबद्दल पूज्यबुद्धी असल्याशिवाय श्रद्धेचा उगम होऊ शकत नाही. ईश्वराबाबत सदिच्छा वा आदर बाळगतो आपण, पण त्याची पूर्तता करणे कठीण असते.

आधुनिक विचारवंतांना तर मानवाच्या जीवनात हस्तक्षेप करणारी ईश्वरावरील श्रद्धा मान्य नव्हती. सर्वश्री जे.

कृष्णमूर्ती, स्वामी परमहंस, म. फुले, आगरकर आदी विचारवंतांच्यामते ईश्वरावर श्रद्धा ही डोळस स्वरुपाची असावी, अंधश्रद्धा नसावी. डोळस श्रद्धाच भक्तास अंतिम ध्येयापर्यंत नेऊ शकते.

साईबाबांच्या आवाहनातसुद्धा डोळस श्रद्धेचाच अग्रह आहे. अंधश्रद्धेपोटी उपवास करणाऱ्या वृद्ध बाईस पुरणपोळीचे जेवण खाऊ घालून श्री साईंनी भक्तांना एक डोळस संदेशच दिला. आत्मक्लेशापेक्षा निष्ठा ही महत्त्वाची हा मौलीक संदेश आहे.

ईश्वराच्या अस्तित्वाची प्रचिती श्रद्धा असल्याशिवाय येऊन शकत नाही. खरे तर स्वत:च्या जन्मरहस्यांकडेच आम्ही डोळसपणे पाहत नाहीत. 'जन्म-निर्मिती-भोग-अंत' या चक्राचा निश्चित हेतू काय असू शकतो ? याचा शोध अजून लागला नाही याचे कारण आम्ही ईश्वर निर्मितीचा आस्वाद (सात्विक) घेण्यापेक्षा त्याचा भोगच घेतो. त्यामुळेच आम्ही 'स्व'च्या पलीकडे पडू शकत नाहीत. आम्ही स्वत:च्या 'अंहम'मध्ये गुरफटलो आहोत. षड्रपूच्या आधीन होऊन स्वत:वरच प्रेम करू लागलो. त्यामुळे दुसऱ्यांची सुख-दु:खे, इतरांचे अस्तित्व आम्हाला समजलेच नाही. यातून बाहेर पडण्यासाठीच बाबांनी त्यांच्या भक्तांना 'श्रद्धा' हा मूलमंत्र दिला आहे. ईश्वराच्या अस्तित्वाच्या प्रचितीसाठी श्रद्धा असणे आवश्यकच आहे. तद्वतच प्रचितिशिवाय श्रद्धा बसत नाही. संतांनी जे चमत्कार भक्तांना दाखवले त्यात त्यांच्या दैवी गुणांपेक्षा ईश्वराच्या अस्तित्वाची ओळख करून देणे हा भावच महत्त्वाचा आहे. त्याकडे डोळस दृष्टीने पाहिले पाहिजे. सामान्य साधकांनी निष्ठापुर्वक भक्ती केली तर ईश्वराची प्रचिती येऊ शकेल.

माणसाला 'इंद्रियज्ञानाचे' वरदान मिळाले आहे. इंद्रियांवर ताबा मिळवून सात्विक जीवनाचा अंगीकार करणे ही ईश्वराच्या प्रचितीच्या मार्गातली सर्वात महत्त्वाची बाब आहे. सात्विकतेच्या अंगीकारासाठी निर्गर्वी, स्वंयशब्दातीत, स्वत:सिद्ध होणाऱ्या निष्कलंक ज्ञानाची गरज असते. (साईचरित्र-अध्याय ३९) यातून निर्माण होणारी निष्ठा किंवा श्रद्धा ही ईश्वर कृपेच्या अनुभूतीसाठी सहाय्यभूत ठरतेच.

एकाग्रतेतून श्रद्धा साध्य होते. एकाग्रतेसाठी स्वत:ला संपूर्णपणे अर्पण करता आले पाहिजे. अर्पण म्हणजे 'देणे.' 'देणे' या शब्दाचा अर्थ मोठा व्यापक आहे. 'दे-देवा, णे-ने.' मला जे मिळाले ते देवाला अर्पण करण्याचा भाव म्हणजे समर्पण होय. ''देवा हे ने (घेऊन जा) ही मानसिकता येण्यासाठी देवाचा मी आणि माझा देव'' हा भाव अवश्यक आहे अन् हा भाव श्रद्धेशिवाय शक्य नाही.

नवस पावला तर ईश्वरावर विश्वास ठेवणे म्हणजे स्वार्थ आला. कारणाशिवाय श्रद्धा ठेवून त्यात सातत्य ठेवणे हीच पूजा असू शकते. अन् या पूजेनेच मानवाचा/भक्ताचा उद्धार होऊ शकतो. अशी पूजा सात्विक श्रद्धेतून साकारत असते.

सात्विक श्रद्धेतून समर्पणाचा भाव येतोच. देशासाठी बलीदान करणारे शहीद हे सात्विक श्रद्धा निष्ठा यांचे प्रतिक होय. थोडक्यात ध्येयाने वेडे होऊनच श्रद्धा ठेवावी.

श्री साईची भक्ती का करायची हा प्रश्नदेखील मनात यावा. त्यांची प्रार्थना करा, त्यांच्याजवळ जा अन् त्यांना प्रामाणिकपणे अवश्यक तेवढे मागा. मागणे याला स्वार्थ जरी मानले तरी एका विशिष्ठ गरजेपूरते मागितल्याशिवाय संसार सुसह्य होत नाही अन् संसार सुसह्य झाल्याशिवाय परमार्थात मन लागणार नाही. जे मिळाले ते ईश्वराने दिले अन् ते ईश्वराचेच आहे असा भाव ठेवून गरजपूर्ती केली तर संसार करत परमार्थ साधला जाईन.

संतांची भूमिका सामान्यापेक्षा वेगळी असते. शिवाजी महाराजांचा नजराणा नाकारण्याचे साहस संत तुकारामातच होते. कारण भौतिक वैभवापेक्षा आत्मिक सुखात त्यांना आनंद होता. रामदासांनी स्वराज्यासाठी शिवाजी महाराजाची मद्वत घेतली खरी पण राज्याच्या वैभवाचा उपभोग त्यांनी घेतला नाही. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत रामदास यांचे मागणे मानवी उद्धारासाठी होते त्यामुळेच त्यांना अन् त्यांच्या इच्छेला ईश्वरीय आधार होता. या सर्व संतांच्या कार्यात श्रद्धा, ध्येय, सातत्य, कर्तव्यपूर्तीसाठी सात्विकतेचा भाव होता. श्री साईबाबांनी भक्ताला ''श्रद्धा व सबुरी'' हा महामूलमंत्र दिला त्यातून त्यांना भक्तांना हेच सांगायचे होते की आपल्या भक्तीत मानवी कल्याणाचे ध्येय असावे तेव्हांच तुम्हाला गुरुकृपा/ईश्वराचा अनूनय होईल.

श्री साईबाबांना मागताना सामाईक मागणे मागावे ज्यातून आपल्याबरोबर इतरांचाही उद्धार होईल अन् अशा सामाईक मागण्याची पूर्तता करण्यात बाबांना आनंदच होईल. कारण विश्वाच्या कल्याणाचा उद्देशच श्री साईच्या ''श्रद्धा सबुरी'' मध्ये सामावलेला आहे. श्रीसंत ज्ञानेश्वराच्या पसायदानात 'तोषूनी मज द्यावे पसायदान हे'' असे जे मागितले तेच भाव श्रीसाईबाबांनी आपल्या आचार व विचारातून सांगितलेले आहेत. भक्तांची केवळ 'श्रद्धा' महत्त्वाची असते.



# जीवात्म्याकडून परमात्म्याकडे

– आदित्य अरुण ताम्हणकर

प्रत्येक जीवात्मा जन्मोजन्मी साधना करीत असतो. आता ही साधना म्हणजे काय, असा प्रश्न उद्भवतो.

साधना ही विविध प्रकारची असते.

**घोर तप :** ही कठोर साधना म्हणून समजली जाते. म्हणजेच, ही साधना करणारा साधक उच्च पातळी गाठलेला आहे, असं म्हटल्यास हरकत नाही.

**उपवास :** हीदेखील एकप्रकारची साधनाच आहे. अत्यंत शुद्ध देवभक्ती, ज्यात बुद्धीवादाचा अंशही दिसत नसला, तरीही तीदेखील एक साधनाच आहे.

अगदी रोज नियमितपणे ईश्वराला नमस्कार करून जाणारा सज्जन हादेखील एक साधकच आहे. मात्र, त्याची घोर तप करणाऱ्याएवढी पातळी नसली, तरी तो सज्जनही एक साधक आहे, हे विसरून चालायचं नाही.

अर्थात, प्रत्येक मनुष्य हा जन्मोजन्मी साधकच असतो. मात्र, प्रत्येकाच्या साधनेत विविधता असल्याने काहींची उच्च श्रेणींची, तर काहींची साधारण प्रमाणाची असते.

थोडक्यात, या जन्मोजन्मीच्या चक्रातून प्रत्येक जीवात्मा सुटण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतो. त्याच्या-त्याच्या बौद्धिक क्षमतेनुसार आणि त्यामुळेच या आध्यात्मिक पातळीवरून विचार केल्यास प्रत्येकाच्या आध्यात्मिक पातळीत नक्कीच फरक असतो. उदाहरणार्थ: एकाने पूर्वजन्मी २००० मैल गाठले असेल, तर दुसऱ्याने ५००० मैल. तर, ५००० मैल गाठणाऱ्याची पातळी २००० मैल गाठणाऱ्याच्या पातळीपेक्षा नक्कीच उंचावलेली असेल.

पूर्वसंचितानुसारच प्रत्येकाची आध्यात्मिक प्रगती होत असते, हे येथे लक्षात घेण्यासारखे आहे.

या विशाल ब्रह्मांडामध्ये प्रत्येक जीवात्मा आपल्या कुवतींनुसार आध्यात्मिक प्रगती करण्याचा, जडत्वातून सुटण्याचा प्रयत्न करीत असतो. जो या जडत्वातून सुटून वायुरुपात जातो तो खऱ्या अर्थाने राजयोगी होय ! असा राजयोगी दिव्यात्मा ब्रह्मांडनायक साक्षात् सूर्यावर वास्तव्य करीत असतो आणि म्हणूनच संत ज्ञानेश्वर महाराजांनी सूर्याला शुद्ध भक्तिभावाने नमस्कार करायला सांगून सूर्यावरील सर्व दिव्यात्मे प्रतिपाळ करतील, असे प्रतिपादिले आहे.

मनुष्य नेमकं याउलट करीत असतो. 'स्व'त्वाला विसरून 'पर'मध्ये रमून जात असतो. त्याच्यातच वसत असलेल्या ईश्वराला सोडून तो इतरांच्या मागे धावत असतो.

ईश्वरानुभूती प्रत्येक सामान्यातल्या सामान्याला लाभू शकते; कारण प्रत्येकात ईश्वर आहे.

**अभय :** चैतन्य म्हणजेच ईश्वरानुभूती. ईश्वरानुभूती भयभीत मानवाला कधीच लाभू शकत नाही. निर्भयी माणसालाच ती प्राप्त असते.

विचार... विचार... अन् विचार... विचारांची ही शृंखला म्हणजेच मन ! यासंबंधात महर्षी रमण म्हणतात, ''विचारांना थांबवून टाका ! अन्, मग मन कुठे आहे मला दाखवा !''

विचार जिथं नाही तिथं मन नाही. विटा नसल्या तर भिंत कशाची बनविणार ?

काहीजण विचारतात, मनाला काय करू ? साधनेला बसलं की मन सैरभैर होतं ! अशावेळी मनाला सोडून द्या, अगदी सोडून द्या, पार सोडून द्या, अन् पहा ! फक्त पहात रहा ! जसं कोणी नदीकिनारी बसून पाण्याच्या प्रवाहाकडे पहात राहतो अगदी तसंच विचारप्रवाहाकडे पहात रहा... अलिप्त, अन् असंग ! पहात रहा, अन् पहात रहा... निर्विकार. त्याला पाहण्याच्या ओघात विचार शून्य होऊन जातात, अन्, मन असतंच कुठं !

मनाच्या रिक्ततेत ज्याचा अनुभव येतो तोच आत्मा ! तेच अंतिम सत्य आहे; कारण तीच सत्ता आहे.

जेव्हा हे सत्य, ही सत्ता त्या साधकाला प्राप्त होते तेव्हा विकार-वासनांची श्रृंखला तुटून पडते. स्व-ज्ञान प्राप्त झाल्यामुळे त्याच्या सर्व इच्छा-आकांक्षा, अपेक्षा संपून जातात, अन्, आध्यात्मिक विश्वात तो झपाट्याने प्रगती करू लागतो !

रामकृष्ण परमहंस म्हणतात, ''तू नाव तर सोड, शिडी तर उभार ! परमात्मा प्रत्येक वेळी तुला तारून न्यायला उत्सुक आहे. ''

'मी'चं ज्ञानच परमात्म्याचं ज्ञान बनून जातं.

'मी' या केंद्राशीच तर सारं जोडलेलं असतं. जन्मानंतर

कदाचित 'मी'चा बोध आधी निर्माण होतो, अन्, मृत्युसमयी सर्वात शेवटी तो जातो. या दोन टोकांमध्ये तोच व्याप्त असतो. इतका सुपरिचित हा 'मी' आहे. पण त्याचवेळी किती अनोळखीदेखील ! याहून अधिक रहस्यमय शब्द मानवी भाषेत दुसरा अन्य नाही.

जीवन संपून जातं, पण 'मी'चं रहस्य काहीकेल्या पूर्णपणे उलगडत नाही.

हा 'मी' कोण आहे ? त्याचा अस्वीकार करणंदेखील शक्य नाही. 'मी' नाही म्हणतानाही तो उपस्थित असतो. अशी ही 'मी'ची माया आहे.

मानवीबोधात हा 'मी' म्हणजे सर्वात सुनिश्चित, अन् सुस्पष्ट तत्व आहे. 'मी' आहे, हा बोध तर आहे; पण ''मी कोण आहे'', हे सहज ज्ञान नाही. हे केवळ साधनेनंच सुलभ आहे.

सारी साधना 'मी'ला जाणण्याची साधना आहे, सारे धर्म, सारं तत्वज्ञान, म्हणजे या एकाच प्रश्नाचं उत्तर आहे. ''मी कोण आहे ?'' हे प्रत्येकानं स्वतःला विचारायचं आहे. सारं सुटून जावं, अन् एकच प्रश्न राहून जावा, साऱ्या मनात ही एकच जिज्ञासा घुमत रहावी. मग, अशारीतीने हा प्रश्न अचेतनात उतरून जातो. प्रश्न जसजसा गहन होऊ लागतो तसतसं वरवरचं तादात्म्य भंग पावू लागतं, दिसू लागतं की, मी शरीर नाही ! दिसू लागतं की, मी मन नाही ? दिसू लागतं की, मी तर 'तो' आहे, जो सर्वांना पहातो आहे ! द्रष्टा आहे मी... साक्षी आहे मी... ही अनुभूती 'मी'च्या वास्तविक स्वरूपाचा साक्षात्कार बनून जाते. सत्याचा साक्षात्कार बनून जातो. या स्वज्ञानाच्या उदयात जीवनरहस्याचे द्वार खुलं होतं. स्वतःशी परिचित होऊन आपण जगताच्या साऱ्या रहस्याशी परिचित होऊन जातो. 'मी'चं ज्ञानच परमात्म्याचं ज्ञान बनून जातं, अन् आनंदानुभूती प्राप्त होते.

प्रत्येक साधकाने यादृष्टीने आध्यात्मिक पाऊल उचलावं. अर्थात, प्रत्येकाच्या क्षमतेत, कुवतीत फरक असल्याने स्वतःला जमेल तेवढंच करावं. स्वामी स्वरूपानंद म्हणाले आहेतच की, लहान मुलाला मऊमऊ अन्न द्यायचं असतं; कारण त्याच्यात ते पचवण्याइतपतच क्षमता असते. अन् जर अधिक कठीण अन्न दिलं तर त्या मुलाला ते पचनास जड जातं, अजीर्ण होतं. त्याचप्रमाणे प्रत्येक साधकाने जमेल तेवढीच उपासना करावी. ईश्वराने दिलेल्या सुंदर देहाला उगाच कष्ट न देता उपासना करावी. कारण प्रत्येक मनुष्यात ईश्वर वसत असतोच, आणि म्हणूनच प्रत्येक मनुष्य हा एक अवतारी मानवच असतो ! फक्त त्याने त्याच्यातल्या 'स्व'ला जागं करायचं असतं. कारण सारं तत्वज्ञान, सारे धर्म हे त्याकरिताच निर्माण झालेले आहेत.

## सुभाषित रसास्वाद :

**– सु. ह. जोशी**

**लालयेत् पंच वर्षाणि दश वर्षाणि ताडयेत् ।**
**प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत् ॥**

पाच वर्षापर्यंत मुलाचे लाड करावेत तिथून पुढे दहा वर्षापर्यंत (मुलाला धाकात ठेवावे. प्रसंगी) मारावेसुद्धा. पण मुलाला सोळावे वर्ष लागले की त्याच्याशी मित्राप्रमाणे वागावे–

बालसंगोपनशास्त्र हा आधुनिक काळातला विषय आहे. पण प्राचीन भारतीयांनाही बालमानसशास्त्राची कल्पना होती, हे या सुभाषितावरून दिसत आहे. मानसशास्त्राच्या दृष्टीनेही हे सुभाषित महत्त्वपूर्ण आहे. अर्थात संगोपनशास्त्रात कठोर नि सर्वांना एकच नियम करता येणार नाही. श्री. वि. आ. बुवा यांच्या घरी एक मार्मिक वाक्य वाचले – 'बालसंगोपन शास्त्रावर पुस्तक लिहावे ही चांगलीच कल्पना आहे, पण मग प्रत्येक मुलागणिक एक स्वतंत्र पुस्तक लिहावे लागेल...'

असो, तर सर्वसाधारण अर्थ असा घेऊ या की, मूल लहान असेस्तोवर त्याला हसवावे, खेळवावे, खाऊ द्यावा, त्याचे काही एका मर्यादेत भरपूर कोडकौतुक करावे, लाड करावे... पण वय वर्षे पाच ते पंधरा हा कालखंड घडणीचा, गुणविकासाचा कालखंड आहे. इथे लाड चालणार नाहीत. ही वर्षे म्हणजे आयुष्याचा पाया. आपल्या मुलाला लेचापेचा, लाडावलेला, उर्मट असे बनवायचे नाही तर शारीरिक, बौद्धिक, मानसिक वर्तनात्मक प्रगती व्हावी म्हणून त्याच्यावर तसे संस्कार केले पाहिजेत. प्रसंगी धाक दाखवून त्याच्याकडून महत्त्वाच्या गोष्टी करून घेतल्या पाहिजेत. थोडक्यात त्याला आकार दिला पाहिजे. आयुष्याचा पाया उत्तम असला पाहिजे. प्रसंगी त्याला रागावले तरी चालेल. छडी वाजे छम्छम् । विद्या येई घमघम ॥ हे काही प्रमाणात खरेच आहे. आणि सोळाव्या वर्षापासून मात्र मुलाला मित्र मानावे, म्हणजे त्याच्यावर आपल्या गोष्टी, आपली मते लादू नयेत. वडिलांचा काळ नि लहान मुलांचा काळ यात पिढीचे अंतर आहे. काही गोष्टीत फरक पडणारच. आपण आपले मन विशाल करावे. हळूहळू त्याच्यावर विश्वास टाकावा, जबाबदारी पेलण्यात त्यांना समर्थ करावे. आवश्यक असेल तिथेच सल्ला द्यावा किंवा हुकूमशहा न बनता सुसंवादाच्या मार्गाने जावे... कदाचित पिता-पुत्र यांच्यात ही दरी उत्पन्न होऊ पाहात आहे तीसुद्धा कमी होऊ शकेल.

# साईउवाच

## साईचे बोल होती ना फोल

अध्याय ४ था

– संग्राहक : प्र. का. सोमण
(निवृत्त लेफ्टनंट कर्नल)

*(मागील अंकावरून पुढे)*



**पार्श्वभूमी**

साईनाथांना नामस्मरणाची मोठी प्रीती व आवड होती. ते स्वत: ''अल्ला मालिक'' नेहमी म्हणत व भक्तांकडून नामसप्ताह करवून घेत. असेच एकदा, महान संत दासगणूंना की जे साईनाथांचे मोठे भक्त होते, नामसप्ताह करायला सांगितला. दासगणूंचा अधिकार मोठा होता. ते म्हणाले मी नामसप्ताह करीन पण प्रत्यक्ष विठ्ठलाचे दर्शन झाले पाहिजे. बाबांनी स्वत:चे छातीस हात लावून म्हटले-

**साईबोल**

**''हो हो प्रगटेल विठ्ठलमूर्ती ।**
**भक्त भावार्थ पाहिजे ॥८४॥**

**ठाकूरनाथांची डंक पुरी ।**
**अथवा विठ्ठल रायाची पंढरी ।**
**ती हीच रणछोड कारकानगरी ।**
**जाणे न दूरी पाहावया ॥८५॥**

**विठ्ठल काय एकांतीचा उठून ।**
**येणार आहे दुसरा कोठून ।**
**भक्त प्रेमे उत्कटून ।**
**एथेही प्रगटून राहील ॥८६॥**

**पुंडलिके वडलांची सेवा ।**
**करुनि भुलविले देवाधि देवा ।**
**पुंडलिकाच्या त्या भक्तिभावा ।**
**विरे विसाया घेतला ॥''**

याप्रमाणे सप्ताह समाप्तीचेवेळी श्री दासगणूंना श्री विठ्ठलाचे दर्शन बाबांनी घडविले.

**पार्श्वभूमी**

यानंतर काही काळाने, महान साईभक्त श्री काकासाहेब दिक्षित शिरडीत ध्यानात बसले असताना, साईभक्तांनी त्यांना विठ्ठलाचे दर्शन घडविले. तेव्हा बाबा त्यांना म्हणाले-

**साईबोल**

**विठ्ठल पाटील आला होता ना ? ।**
**भेट झाली ना ? । तयाची ॥९०॥**

**मोठा पळकुटा बरे तरा विठ्ठल ।**
**मेख मारुनि करी त्या अढळा**

**दृष्टि चुकवुनी काढील पळ ।**
**होता पळ एक दुर्लक्ष ॥९१॥**

**पार्श्वभूमी**

भगवंतराव क्षीरसागर हे साईभक्त विठ्ठलाचेही मोठे भक्त होते व त्यांची पंढरीची वारी कायमची असे. पण त्यांचा मुलगा भगवंतराव याने वडलांचे पश्चात पूजा अर्चा वगैरे सारे सोडून दिले. देवाला नैवेद्यही तो देत नसे. या मुलाला वळणावर

आणण्याचा बाबांनी विचार केला हे त्याचे महान भाग्यच म्हणायचे. याबाबत भगवंतरावाचे वडिलांना उद्देशून बाबा म्हणाले -

**साईबोल**

**''ना होता दोस्त माझा।**
**हा त्या माझ्या स्नेह्याचा सुत।**
**म्हणुनि यासी मी आणिला खेचित।**
**नाही कधी हा नैवेद्य करीत।**
**उपाशी ठेवीत मजलाही ॥१००॥**

**विठ्ठलासीही ठेवी उपाशी।**
**म्हणूनी शिरडीस आणले त्यासी।**
**आता देईन आठवणीसी।**
**लावीन पूजेसी याजला ॥१०१॥**

**पार्श्वभूमी**

**१६** वर्ष-वयाचे बाबा प्रत्यक्ष शिरडीवासियांनी पाहिले. मोठे गोड गोरे गोरे गोमटे तरुण पोर पाहून शिरडीचे लोक मनात चूर झाले. प्रगटले तेच ब्रह्मज्ञानी, विषद-वासना स्वप्नीही नाही, मायेचा स्पर्श झालेला नाही, ते कोठून आले, त्यांचे मातापिता कोण, त्यांचे गणगोत कोणते वगैरे ??? विचारून गावकरी थकले पण त्यांना बाबांचा थांगपत्ता लागला नाही. पण एक दिवशी नवल झाले. ''खंडोबाचे वारे'' शिरडी गावात आले. दोघेचौघे घुमू लागले. एकाचे अंगी खंडोबा आला तेव्हा बाबांबद्दल देवाला गावकऱ्यांनी प्रश्न विचारले. तेव्हा देवाने सांगितले-

**देव बोल**

**जा कुदळी आणा।**
**दाविलो ते जागी खणा।**
**लागेल या पोराचा ठिकाणा।**
**कुदळी हाणा ये जागी ॥१२६॥**

**मग नेमेचि त्या गाव कुसासवळी।**
**त्याच निंबवृक्षाचे तळी।**
**मारिता कुदळीवरी कुदळी।**
**विटा ते स्थळी आढळल्या ॥१२७॥**

**पुरा होताच विटांचा थर।**
**जात्याची तळी सारता दूर॥**
**दृष्टिस पडले एक भुयार।**
**समया चार जळती जै ॥१२८॥**

**चुनेगच्ची ते तळघर।**
**गोमुखी पाह मान सुंदर।**
**देव म्हणे बारा वर्षे हा पोर।**
**तप आचरिला ये स्थळी ॥१२९॥**

**मग जन सर्व आश्चर्य करिती।**
**खोद खोदूनि पोरास पुसती।**
**पोर तो बारा मुलखाचा गमती।**
**कथा भलतचि सांगितली ॥१३०॥**

**म्हणे हे माझ्या गुरुचे स्थान।**
**अति पवित्र हे माझे वतन।**
**आहे तैसेचि करा हे जतन।**
**माना मद्‌वचन एवढे ॥१३१॥**

पुढे काय झाले ते पाहा-

**असो, बाबांच्या आज्ञेवरून।**
**पूर्वीप्रमाणे विरा लावून।**
**भुयार टाकिले बंद करून।**
**निज गुरुस्थान म्हणून ते ॥१३५॥**

**जैसा अश्वत्थ वा औदुंबर।**
**तैसाचि बाबासि तो निंब तरुवर।**
**प्रीती फार त्या निंबावर।**
**अती आदर तयांचा ॥१३६॥**

**म्हाळसापती आदिकरून।**
**जुने शिरडीचे ग्रामस्थजन।**
**बाबांच्या गुरुंचे हे समाधीस्थान।**
**म्हणोनि वंदन करिती ॥१३७॥**

**''गुरुवार आणि शुक्रवारी।**
**सूर्यास्त सारवुनिया वरी।**
**ऊद जाळील जो क्षणभरी।**
**देईल श्रीहरी सुखतया'' ॥१४३॥**

**ही साईमुखींची अक्षरे।**
**श्रवणद्वारे परिसिली ॥१४४॥**

**शुभंकर अध्याय चौथा समाप्त।**
**ॐ श्री साईराम चरणार्पण मस्तु॥**

## अध्याय ५ वा



### पार्श्वभूमी

श्री साईनाथांचे कौतुक पाहा ! देव भक्ताला सुखविण्यासाठी व त्याचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी स्वत:कडे कधीकधी कमीपणा घ्यायलाही मागे पुढे पाहात नाही, हे पाहाण्यासारखे असते. एकदा एक विड्याची पाने विकणारा धिप्पाड तांबोळी बाबांकडे आला. त्याकाळी बाबांच्या देवात्वाची कल्पना व प्रचिती काही भक्तांनाच आली होती. हा तांबोळी त्यापैकी नव्हता. त्याला स्वत:च्या पैहिलवानगिरीची काहीशी घमेंड होती. त्याने काहीतरी भांडणाचे खुसपट काढून बाबांना त्याच्याशी कुस्ती खेळण्यास भाग पाडले. प्रत्यक्ष देवाशी एक मर्त्य माणूस टक्कर देऊ इच्छित होता !! देवाला काय अशक्य आहे ? पण असे असतानाही, भक्ताच्या आनंदाअंताकरताच जणू, बाबा कुस्तीत हरले. पण तेव्हापासून मात्र, बाबांनी आपली वेशभूषाच बदलून टाकली. त्यांनी आत लंगोट बांधून वर कफनी घालायला सुरुवात केली. डोक्याला फडके बांधू लागले. बसण्यासाठी तरटाचे आसन व झोपायलाही गोणते घेऊ लागले. अंगात फाटके तुकडे कपडे घालू लागले. त्यावेळी बाबा काय म्हणाले ते ऐका-

''गरिबी अव्वल बादशाही।<br>
अमीरीसे लाख सवाई।<br>
गरिबोंका अल्ला भाई।''<br>
(अक्षयी साई वदन की) ॥६८॥

### पार्श्वभूमी

वर वर्णिलेल्या तांबोळी सारखीच आणखी एक फकिराची गोष्ट ऐका. तांबोळीनंतर पाच वर्षांनी घडलेली ही गोष्ट आहे. मुळचा अहमदनगरचा जव्हार अली नावाचा एक फकीर शिरडीत आला व साईनाथांबरोबर मशिदीत राहू लागला. त्याचा कुराणाचा चांगला अभ्यास होता व तो मोठा मृदूभाषी होता. त्याच्या हुषारीने व गोड गोड बोलण्याने पुष्कळ शिरडीवासी प्रभावीत झाले व ते त्याच्या भजनी लागले. यामुळे पुढे पुढे तो एवढा निर्ढावला की बाबांनी त्याचे शिष्यत्व पत्करावे ही गळ तो बाबांना घालू लागला. लीलाधारी बाबांनी मोठे नाटक केले व त्यांनी त्या फकिराचे शिष्यत्व पत्करले. मग तो बाबांना घेऊन जवळच्या गावी 'राहात्यास' राहायला गेला. साईबाबांनी फकिराचे शिष्यत्व पत्करीले आहे ही बातमी आसमंतात हां हां म्हणता पसरली. त्यामुळे त्या फकिराचा 'अहं' आणखीनच फोफावला. हा सारा प्रकार पाहून शिरडीच्या साई भक्तांना अत्यंत दु:ख झाले व बाबा शिरडीला आता कायमचे अंतरणार ही भीती त्यांना वाटू लागली. म्हणून ते सारे साईबाबांना बोलावण्यासाठी राहात्यास गेले. त्यावेळी तो फकीर कोठे बाहेर गेला. सारे भक्त त्यावेळी बाबांना भेटले व बाबांनी शिरडीस परतावे म्हणून बाबांना अत्यंत आर्ततेने प्रार्थना केली. त्यावेळी आपण जसे काही त्या फकिराच्या पूर्ण कह्यात आहोत हे दाखविण्यासाठी बाबा भक्तांना म्हणाले-

'' फकीर आहे महाक्रोध।<br>
लागू नका तयाचे नादी।<br>
तो मज कधीच न विसंबे।<br>
तुम्ही येथून करा पलायन ॥१३६॥

आत्ताच येईल गांवातुन।<br>
करील तुमचे निसंतान।

परम कठीण क्रोध त्याचा ॥१३७॥

राग तयाचा मोठा कडक।
येताच होईल लालभडक।
जा जा निघून जा की तडक।
धरा की सडक शिरडीचा ॥१३८॥

तेवढ्यात तो फकीर तेथे पोहोचला आणि साऱ्या साईभक्तांना तेथे पाहून त्याने ठणकावले -

''आलात काय पोरासाठी।
काय करितसा येथे गोष्टी।
शिरडीस माघारा न्यावे हे पोरी।
परी या कष्टी पडू नका ॥१४०॥

असे जरी प्रथम तो फकीर म्हणाला, तरी एवढ्या मोठ्या ग्रामस्थांपुढे तो कचरला व त्यांना म्हणाला, ''मला व मुलाला (म्हणजे तरुण-साईंना) शिरडीस घेऊन चला.'' पुढे श्री अण्णासाहेब दाभोळकर साईसत्‌चरितमध्ये म्हणतात-

''साई परब्रह्म पुतळा।
जव्हार अस्ती भ्रमाचा भोपळा।
देविदासे कसास लाविला।
भोपळा पुटला शिरडीत'' ॥१४३॥

(ही यापुढची सारी रम्य कथा, ५ व्या अध्यायात १४४ ओव्यानंतर साईसच्चरित्रात आली आहे. ती स्वतंत्रपणे वाचावी.)

शुभंकर अध्याय ५ वा समाप्त

## अध्याय ६ वा

### पार्श्वभूमी

सर्वसाधारणपणे मनुष्यप्राणी पोटार्थी असतो व तो सदासर्वकाळ त्याच्या संसारात बुडालेला असतो. त्याची सारी ताकद व वेळ तो पोटापाण्याच्या उद्योगात व विवंचनेत घालवतो. पण भक्तीचा उगम जर त्याचे हृदयात निर्माण झाला असेल व तो सन्मार्गाने देवाचा एक भक्त म्हणून आर्ततेने वागत असेल, तर साईनाथ त्याला अश्वासन देतात की-

''माझिया भक्ताचे धामी।
अन्नवस्त्रास नाही कमी।
मज भजती जे अनन्यपणे।
सेविती नित्याभियुक्त मने।
तयांचा योगक्षेम चालविणे।
ब्रीद हे जाणे मी माझे'' ॥३४॥

(श्री अण्णासाहेब दाभोळकर पुढे सांगतात-

हेचि भगवद्वचन।
साई म्हणती माना प्रमाण
नाही अन्नवस्त्राची वाण।
तदर्थ प्राण वेचू नका ॥३५॥

देवद्वारी मान व्हावा।
देवापुढेचि पदर पसरावा॥
तयाचाच प्रसाद जोडावा।
मान सोडावा लौकिकी ॥३६॥

काय लोकी मान डोलविली।
तितुक्याने का भस्सी भुली।
आराध्यमूर्ति चित्ती द्रवली।
धर्मे डवडवली पाहिजे ॥३७॥

हेचि ध्येय लागो गोड।
सेर्वेंद्रियी भक्तीचे वेड।
इंद्रिय विकारा भक्तीचे मोड।
फुटोत कोड मग काय ॥३८॥

सदैव ऐसे भजन घडो।
इतर काहीही नावडो॥
मन मन्नामस्मरणी जडो।
विसर पडो अवघ्याचा ॥३९॥

नाही मग देह–गेह वित्त।
परमानंदी जडले चित्त।
मन समदर्शि आणि प्रशांत।
परीपूर्ण निश्चित होईल ॥४०॥

सत्संग केलियाची खुण।
वृत्तीसी पाहिजे समाधान।
नानाठायी वसे जे मन।
ते काय 'सल्लीन' म्हणावे ॥४१॥

शुभंकर अध्याय ६ वा समाप्त।

# श्लोकात गीता सार

गेले कौरव आणि पांडव रणी वर्णी कथा संजय ।
ती ऐके धृतराष्ट्र उत्सुक मने वाटे तया विस्मय ॥
पाहे पार्थरणी कुलक्षय घडे चित्ती विषादाधरी ।
युद्धापासुनी विमुख तै टाकी धनुष्या दुरी ॥१॥

झाला अर्जुन शोक मग्न बघुनी वेदांत सांगे हरी ।
आत्मा शाश्वत देहनश्वर असे जाणुनि हे अंतरी ॥
घेई  बाणधनु करी समर तू कर्तव्य ते आचरी ।
वागे निस्पृह हर्ष शोक न धरी ज्ञानी जनांच्या परी ॥२॥

विभो कर्माहूनी अधिक बरवे ज्ञान म्हणसी ।
तरी कां तू येथे मजकरवी हिंसा करविसी ॥
वदे तै पार्थासी यदुपति, करी कर्म नियतें ।
फलेच्छा सांडोनी सहज मग नैष्कर्म्य घडते ॥३॥

हराया भूभारा अमित अवतारांसि धरितों ।
विनाशुनी दुष्टां, सतत निजदासा सुखवितो ॥
नियंता मी भूतां समजुनि असे कर्ममजसी ।
समर्पी तू कर्मी मग तिळभरी बद्ध नससी ॥४॥

करी सारी कर्मे विहित निरहंकार असुनी ।
त्यजी प्रेमद्वेषा धरुनि समता जो निशिदिनी ॥
जया चिंता नाही पुढिल अथवा मागिल मनी ।
खरा तो संन्यासी स्थिरमतिही संकल्प सुटुनी ॥५॥

चित्ताचा सखमा निरोध करणे हा योग मानी खरा ।
हा मी हां परवाद हा कथी नसे चित्ती मुळी ज्या नरा ॥
जो सप्रेम सदा भजे मज तसा जो सर्वभूतीं सम ।
ठेवी सद्गत चित्त त्याहुनि योगी नसे उत्तम ॥६॥

माझ्या केवळ जाहली प्रकृतिने ही सृष्टी सारी असे ।
पृथ्वीमाजी सुगंध मीच रस मी तोयांत पार्था वसे ॥
सर्वांतद्गत मी परी नुमजती जे ग्रस्त माया बळे ।
जे चित्ती मज चिंतिती सतत ते तापत्रया वेगळे ॥७॥

सदा ध्याती माते हृदय कमळी जे स्थिरमने ।
तया मी देहांती सुख अमित देतो हरी म्हणे ॥
तरी पाथी माझे निशिदिनी करी ध्यानभजन ।
मिळूनी मद्रूपी मग चुकविसी जन्म मरण ॥८॥

भक्तीने जल पुष्प फल की काही दुजे अर्पिले ।
ते मातेप्रिय ते चिजे नर सदा मत्कीर्तनी रंगले ॥
पार्था ! ते मुख धन्य ज्या मुखि वसे मन्नाम संकीर्तन ।
विष्णो कृष्ण मुकुंद माधव हरे गोविंद नारायण ॥९॥

कोठे देवासी चिंतू जरि म्हणसी असे ऐक माझ्या विभूती ।
संक्षेपे अर्जुना हे तुज गुज कथितो मी असे सर्व भूती ॥
मी धाता विष्णु मी श्री शिवरवि निगमी समा मी विश्वरुप ।
माझी सर्वत्र सत्ता जगी असुनि असे दिव्य माझे स्वरूप ॥१०॥

पार्थ विनवी माधवासि विश्वरुप भेटवा ।
म्हणूनियां हरी धरी विटक रुप तेधवा ॥
मांडिला अनर्थ भोर पांडुकुपर घाबरे ।
म्हणे पुनश्च दाखवा विभो स्वरुप गोजिरे ॥११॥

बरी सगुणभक्ति की भजन निर्गुणाचे बरे ।
पुसे विजय हे तदा हरी वदे तया आदरे ॥
असोत बहु योग ते तरिही भक्ति योगाहुनी ।
तसेचि दुसरा असा सुलभ जो श्रमावाचुनी ॥१२॥

क्षेत्र क्षेत्रज्ञ दोन्ही कथुनि मग पुढे कृष्ण पार्थासि सांगे ।
ज्ञानी त्याते म्हणावा मज भजुनि करा जो मदाने न वागे ॥
तैसा ज्या भेद बाणें प्रकृति पुरुषिचा सर्व ठायी समत्व ।
कर्माची त्यासि बाधा तिळभरहि नसे पावला जो प्रभुत्व ॥१३॥



पार्था मी जनिता तशीच जननी माया जगत्संतती ।
जींबा सत्वरजतमस्त्रिगुण हे स्वाभाविक व्यापिती ॥
जो सेवी परि भक्तिने मंज तया हे बाधिती ना गुण ।
झाला मत्सम तो, प्रियाप्रिय नसे
त्याते नुरे मी पण ॥१४॥

उर्ध्वी मूळ तळी अपार पसरे अश्वत्थ संसार हा ।
छेदामा दृढ शस्त्र एकचि तया नि:संगता भूरुहा ॥
ऐसे ओळखुनी क्षराक्षर, मला जे पूजिती भारता ।
होती ते कृतकृत्य कळुनी पावोनि सर्वज्ञता ॥१५॥

दैवी प्रकृति लक्षणे मनि धरीं धैर्यक्षमाप्रौढता ।
चित्तस्वास्थ्य दया शुचित्य मृदुता सत्यादि बा भारता ॥
आता दंभ असत्य मत्सरपणा वर्मी परा बोलणे ।
कामक्रोध अहंकृति त्यज सदा ही आसुरी लक्षणे ॥१६॥

सत्व रजस्तम तीन गुणासह श्रद्धा तप मरण ज्ञान तसे ।
विविध अन्नही निजबीजापरी आवडी त्यावर दृढ बैसे ॥
उत्तम मध्यम अधम जाणही क्रमे तयातुनि सत्व धरीं ।
मगॐ तत्सत् वदुनि धनंजय ! ब्रह्म समर्पण कर्म करी ॥१७॥

त्यजू पाहसी युद्ध परी ते प्रकृति करविल तुज कडूनि ।
तरिवद पार्था परिसुनि गीता रुचते ममता का अजुनि ॥
मग तो बदला मोह निरसला संशय नुरला खरोखरी ।
कृतार्थ झालो प्रसाद मन हा वचन तुझे मज मान्य हरी ॥१८॥

गुरु प्रत्यक्ष ईश्वर । ब्रह्मा विष्णु महेश्वर ।
गुरुचि वस्तुत: परमेश्वर । ब्रह्म परात्पर गुरुराया ॥
गुरु जननी, गुरु  पिता । गुरु त्राता देव कोपता ।
गुरु कोपता कोणी न त्राता । सदा सर्वदा जाणावे ॥

हेमाडपंत

(श्री साईसच्चरित अध्याय १७,२०.२१)

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिरडी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |

# साईभक्तांना आवाहन




प्रिय साईभक्तांनो !
सप्रेम नमस्कार,

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपण सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकीत,
**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
'श्री साईलीला'

--- इथे कापा ---

कार्यकारी संपादक
'श्री साईलीला',
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई - ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येक ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

## साईभक्त मंडळाच्या सदस्य आणि त्यांच्या नातेवाईकांना आवाहन

श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या श्री साईभक्त मंडळाच्या सर्व सभासदांना व गेल्या काही वर्षांत स्वर्गवासी झालेल्या सभासदांच्या नातेवाईकांना, या आवाहनाद्वारे कळविण्यात येते की, श्री साईभक्त मंडळाच्या सभासदांची यादी अद्ययावत करण्यात येत असून ज्या साईभक्तांना त्यांच्या नावात व निवासस्थानात दुरुस्ती सुचवायची असेल त्यांनी आणि स्वर्गवासी झालेल्या सभासदांच्या नातेवाईकांनी स्वर्गवासी झालेल्या भक्ताचे नाव व निवासस्थान याविषयी, पुढील ठिकाणी त्वरेने कळविणे.

कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी, मु. पो. शिरडी - ४२३ १०९,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर, महाराष्ट्र राज्य.

## साईभक्त मंडल के सदस्य और उनके रिश्तेदारों से अपील

यह दुःख की बात है कि श्री साईबाबा संस्थान, शिरडी के साईभक्त मंडल के कुछ सदस्य अब हमारे बीच में नहीं है। लेकिन जानकारी प्राप्त न होने के कारण ऐसे साईभक्त सदस्यों के नाम साईभक्त मंडल सदस्य सूचि में सम्मिलित हैं। साईभक्त मंडल के सदस्यों की अद्यतन सूचि बनाने का काम शुरू है। विद्यमान सदस्यों से बिनती है कि संस्थान के पास उपलब्ध उनकी जानकारी में वे कुछ बदल या सुझाव चाहते हैं, तो वे निम्न पते पर लिख भेजे। परलोकवासी साईभक्त सदस्यों के रिश्तेदारों से भी बिनती है कि वे परलोकवासी साईभक्तों के बारे में संस्थान के निम्न पते पर लिख भेजें।

कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी, मु. पो. शिरडी - ४२३ १०९,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर, महाराष्ट्र राज्य.

## AN APPEAL TO THE MEMBERS OF THE SAI BHAKTA MANDAL AND THEIR RELATIVES

We observed and deeply regret to state that, in the post, several members of the Sai Bhakta Mandal of Shri Sai Baba Sansthan, Shirdi, have left for their heavenly abode. However, the information has not reached the Sansthan. Now, the Sansthan is in the process of updating the list of the members of the Sai Bhakta Mandal. We appeal to the existing members to confirm their details as per the Sansthan's present records.

We also appeal to the relatives of the members, who are no longer in this world.


**Executive Officer,**
Shri Sai Baba Sansthan, Shirdi, At & Post Shirdi - 423 109,
Tal. Kopargaon, Dist. Ahmednagar, Maharashatra State.

## સાઈભકત મંડલના સદસ્ય અને તેમના રિશ્તેદારો માટે અપીલ

દુ:ખની વાત છે કે ઘણાં સાંઈ ભક્તો/સંસ્થાનના સાઈભકત મંડલના સભાસદો આપણી વચ્ચે રહ્યાં નથી. પરંતુ સંસ્થાનને જાણકારી ન હોવાથી સભાસદોની સુચીમાં સુધારા થઈ શકયા નથી. હાલમાં સભાસદોની નવી સુચી તૈયાર કરવાનું કામ ચાલુ છે. હાલના સભાસદો ને વિનંતી છે કે તેમના નામ તથા સરનામા માં ફેરફાર હોય તો નીચે જણાવેલ સરનામા પર પત્ર મોકલી સંસ્થાન ને પોતાની યોગ્ય માહીતી મોકલે. તે જ પ્રમાણે જે સભાસદો આપણી વચ્ચે રહ્યા નથી તેમના રીશ્તેદારોને પણ વીનંતી છે કે એવા સભાસદો અંગેની માહીતી નીચે જણાવેલ સ્થળે મોકલી આભારી કરશોજી.

કાર્યકારી અધિકારી,
શ્રી સાઈબાબા સંસ્થાન, શિરડી, મુ. પો. શિરડી - ૪૨૩ ૧૦૯,
તા. કોપરગાંવ, જિ. અહમદનગર, મહારાષ્ટ્ર રાજ્ય.

Sri Saibaba is taking bath at Dwarkamai



द्वारकामाईच्या व्हरांड्यात स्नान करतानाचे श्रीसाईबाबांचे एक दुर्मिळ छायाचित्र.